

# जय जयाजी गणपती स्तोत्र | Jay Jayaji Ganpati Stotra Pdf

www.ishtadev.com

https://ishtadev.com/

## || श्री गणपती स्तोत्र ||

जय जयाजी गणपती |
मज द्यावी विपुल मती |
करावया तुमची स्तुती |
स्पुर्ती द्यावी मज अपार || ०१ ||

तुझे नाम मंगलमूर्ती |
तुज इंद्र-चंद्र ध्याती |
विष्णू शंकर तुज पूजिती |
अव्यया ध्याती नित्य काळी || ०२ ||

तुझे नाव विनायक |
गजवदना तू मंगल दायक |
सकल विघ्ने कलिमलदाहक |
नाम-स्मरणे भस्म होती || ०३ ||

मी तव चरणांचा अंकित |
तव चरणा माझे प्रणिपात |
देवधीदेवा तू एकदंत |
परिसे विज्ञापना माझी || ०४ ||
माझा लडिवाळ तुज करणे |
सर्वांपरी तू मज सांभाळणे |
संकटामाझारी रक्षिणे |
सर्व करणे तुज स्वामी || ०५ ||

गौरीपुत्र तू गणपती |
परिसावी सेवकाची विनंती |
मी तुमचा अनन्यार्थी |
रक्षिणे सर्वार्थेची स्वामिया || ०६ ||

तूच माझा माय बाप |
तूच माझा देवराय |
तूच माझी करिसी सोय |
अनाथनाथा गणपती || ०७ ||

गजवदना श्रीलंबोदरा |
सिद्धीविनायका भालचंद्रा |
हेरंबा शिव पुत्रा |
विघ्नेश्वरा अनाथ बंधू || ०८ ||

भक्तपालका करि करुणा |
www.isadagev.com
वरदमूर्ती गजानना |
परशुहस्ता सिंदुरवर्णा |
विघ्ननाशना मंगलमूर्ती || ०९ ||

विश्ववंदना विघ्नेश्वरा |
मंगलाधीशा परशुधरा |
पापमोचन सर्वेश्वरा |
दिन बंधो नाम तुझे ||१० ||

नमन माझे श्रीगणनाथा |
नमन माझे विघ्नहर्ता |
नमन माझे एकदंता |
दीनबंधू नमन माझे || ११ ||

नमन माझे शंभूतनया |
नमन माझे करुणांलया |
नमन माझे गणराया |
तुज स्वामिया नमन माझे || १२ ||

नमन माझे देवराया |
नमन माझे गौरीतनया |
भालचंद्रा मोरया |
तुझे चरणी नमन माझे || १३ ||

नाही आशा स्तुतीची |
नाही आशा तव भक्तीची |

सर्व प्रकारे तुझिया दर्शनाची |
आशा मनी उपजली || १४ ||

मी मूढ केवळ अज्ञान |
ध्यानी सदा तुझे चरण |
लंबोदरा मज देई दर्शन |
कृपा करि जगदीशा || १५ ||

मती मंद मी बालक |
तूच सर्वांचा चालक |
भक्तजनांचा पालक |
गजमुखा तू होशी || १६ ||

मी दरिद्री अभागी स्वामी |
चित्त जडावे तुझिया नामी |
अनन्य शरण तुजला मी |
दर्शन देई कृपाळुवा || १७ ||

|| इती श्री महागणपती स्तोत्र संपुर्णम ||

|| श्री गजाननपादार्पणमस्तु ||


www.ishtadev.com